# राजर्षी छत्रपती शाहू महाराज

## महाराष्ट्रातील  समाजसुधाराकांचा इतिहास


प्रा. अश्विनी खवळे

इतिहास विभाग


बी. ए. भाग २


विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर ( स्वायत्त)

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज



- आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात आपल्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक कार्याद्वारे बहुजन समाजाला जागृत करण्याचे व त्यांची सर्वांगिण प्रगती घडवुन आणणारे प्रजाहितदक्ष सत्ताधीश म्हणजे कोल्हापूर येथील राजर्षी छत्रपती शाहु महाराज होय.
- महात्मा फुलेंनी सुरु केलेले समाज सुधारणांचे कार्य पुढे नेण्याचे कार्य शाहु महाराजांनी केले. एक आदर्श राजा म्हणुन शाहु महाराजांचा उल्लेख करणे महत्वाचे ठरते. त्यांनी केलेल्या कार्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्व कोल्हापूर संस्थानापुरते मर्यादित न राहता महाराष्ट्र व भारतातही लोकप्रिय झाले



# शाहु महाराजांचे बालपण



- छत्रपती शाहु महाराज हे जन्मत: राजघराण्यातील नव्हते. ते कागलच्या घाटगे घराण्यातील होते. जयसिंगराव आबासाहेब घाटगे हे कागल परगण्याचे जहागीरदार होते.
- जयसिंगराव आबासाहेब घाटगे आणि त्यांची पत्नी राधाबाईसाहेब या दांपत्याच्या पोटी राजर्षी शाहु महाराजांचा जन्म २६ जुन १८७४ रोजी झाला. त्यांचे मुळ नाव यशवंतराव होते.
- कोल्हापूर संस्थानाचे राजे चौथे शिवाजी यांच्या मृत्युनंतर कोल्हापूरच्या गादीवर कोणी वारस नव्हते. म्हणुन शाहुंना कोल्हापूरच्या संस्थानिकाच्या विधवापत्नी महाराणी आनंदीबाईनी दत्तक घेतले.
- १८८४ मध्ये दत्तक विधी झाला, दत्तक घेतल्यानंतर यशवंतरावांचे नाव शाहु छत्रपती असे ठेवण्यात आले, हेच ते राजर्षी शाहु महाराज होय.

# शाहु महाराजांचे शिक्षण :

❖ शाहु महाराज दत्तक म्हणुन येण्यापुर्वीच त्यांच्या शिक्षणांचा प्रारंभ झाला होता. राजकोट व धारवाड येथे त्यांचे शिक्षण झाले. फ्रेजर या इंग्रजी शिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे शिक्षण झाले.

❖ १८८५ मध्ये महाराजांना राजकोट येथील राजकुमार कॉलेजात पाठविण्यात आले. त्यांचे लहान बंधु श्रीमंत बापूसाहेब, श्रीमंत काकासाहेब व दत्ताजीराव इंगळे हे आरंभापासुन महाराजांचे सहाध्यायी होते. हे सहाध्यायी या कॉलेजातही महाराजांबरोबर होते.

❖ कुस्ती, शिकार व घोडयावर बसणे याबाबतीत महाराजांची बरोबरी करणारा एकही राजकुमार नव्हता. इ. स. १८८५ ते इ. स. १८८९ पर्यंत महाराजांनी राजकोट येथील महाविद्यालयातील शिक्षण पुर्ण केले. इ. स. १८९० ते इ.स. १८९४ या काळात धारवाड येथे शिक्षण पुर्ण झाले.

❖ सर स्टुअर्ट फेजर आणि रघुनाथराव व्यंकोजी सबनीस हे त्यांचे येथील गुरु होते. महाराजांनी इंग्रजी भाषा राज्यकारभार आणि जगाचा इतिहास इत्यादी विषयाचे सखोल ज्ञान घेतले. इ.स. १८८९ मध्ये इंग्रज सरकारने महाराजांचे टयुटर व गार्डियन म्हणुन फ्रेजर यांना नियुक्त केले होते. इ. स. १८९४ मध्ये ते या पदावरुन निघुन गेले.

# विवाह

- शाहु महाराजांचा विवाह ते धारवाड येथे शिक्षण घेत असताना १ एप्रिल १८९१ रोजी झाला. पत्नी श्रीमंत लक्ष्मीबाईसाहेब या बडोद्याचे गुणाजीराव खानविलकर यांच्या कन्या होत. विवाह प्रसंगी लक्ष्मीबाईचे वय ११ वर्षे होते.
- महाराजांचे शिक्षण चालु असतानाच लक्ष्मीबाईच्या शिक्षणाची सोय करण्यात आली. महाराजांना ४ अपत्य होती.
- राधाबाई व आऊसाहेब या दोन मुली, छत्रपती राजाराम महाराज व राजकुमार शिवाजी महाराज ही दोन मुले होते.
- श्री आऊसाहेब लहानपणीच मरण पावल्या तर राजकुमार शिवाजी महाराज रानडुकराचा पाठलाग करताना मरण पावले.

# अधिकार ग्रहण :

- शिक्षण पुर्ण झाल्यावर छत्रपती राजर्षी शाहु महाराजांनी २ एप्रिल १८९४ रोजी कोल्हापूर संस्थानाच्या राज्यकारभाराची सुत्रे हाती घेतली.
- अधिकार सुत्रे हाती आल्यानंतर राज्याचा रथ धार्मिक स्वातंत्र्याच्या, सामाजिक क्षमतेच्या, आर्थिक सुधारणांच्या, शिक्षण व ज्ञान प्रकाशाच्या दिशेने हाकण्यासाठी ते सज्ज झाले.
- आमचे प्रजाजन सदासुखी व संतुष्ट असावेत, त्यांच्या हिताची एक अभिवृत्ती होत जावी व संस्थानाचा सर्व बाजुंनी अभ्युदय व्हावा अशी आमची उत्कट इच्छा आहे. यासाठी सर्वांच्या उज्वल राजनिष्ठेची व सहकार्याची आम्हास आवश्यकता आहे असे त्यांनी प्रतिपादन केले.
- शाहुंनी आपल्या राज्यातील जनतेच्या कल्याणाच्या विविध योजना आखून, कार्य सुरु केले. प्रजेच्या सुखातच राज्याचे सुख आहे या धोरणाची त्यांनी अंमलबजावणी केली. शाहु महाराजांनी राज्यातील अनेक गुणी कारागिरांना उत्तेजन दिले.
- त्यांनी ब्राम्हणेत्तर चळवळीचे नेतृत्व खंबीरपणे केले. त्यांनी सुरु केलेल्या ब्राम्हणेत्तर चळवळीचा उद्देश समाजातील सामाजिक विषमता नष्ट होऊन सामाजिक न्याय प्रस्थापित व्हावा हाच होता.

# वेदोक्त प्रकरण :

- वेदोक्त प्रकरणाला राजर्षी शाहूंच्या जीवनात तसेच आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीत महत्वाचे आहे. शाहु महाराज हे धार्मिक प्रवृत्तीचे होते. दरवर्षी प्रमाणे ऑक्टोबर १८९९ मध्ये कार्तिक महिन्यात महाराज पंचगंगा नदीवर स्नानास गेले होते.
- महाराजांच्या स्नानाच्या वेळी नारायण भटजी मंत्र म्हणत होते. भटजी स्नान न करताचा वेदोक्त मंत्राऐवजी पुराणोक्तमंत्र उच्चारत होते. छत्रपती शाहु महाराज वेदोक्त मंत्राचे मानकरी असताना भटजी तर पुरणोक्त मंत्र म्हणत होते.
- वैदिक मंत्र म्हणते वेळीच स्नानाची आवश्यकता असते परंतु शुद्रांना पुराणोक्त पध्दतीचा अनुग्रह करावयाचा असल्याने मला स्नानाची आवश्यकता नाही क्षत्रिय कुलवंतास हिंदु पदपातशहा अशी बिरुदावली असणा-या शाहु महाराजांना एका सामान्य भटजीने शुद्र म्हणुन हिणवावे हा विचारच महाराजांना असहय करणारा होता.
- या प्रकरणाने त्यांना चिंतनशील बनवले शाहु महाराज शुद्र नसून क्षत्रिय आहेत. आपण वैदिक मंत्रानेच सर्व विधी केले पाहिजेत असे नारायण भटजीला शाहु महाराजांनी सांगितले. तेव्हा भटजी म्हणाले आपण शुद्र आहात व शुद्रांनी पुरणोक्त मंत्र म्हणावयाचे असतात.

- ❖ब्राम्हण वर्ग जोपर्यंत तुम्हास क्षत्रिय म्हणून मान्यता देत नाही तोपर्यंत तुम्ही शुद्रन आहात अशी भूमिका नारायण भटजींनी घेतली. पण आपण क्षत्रिय असल्यामुळे आपल्या घरातील धार्मिक विधी व संस्कार पुरणोक्त मंत्राऐवजी वेदोक्त मंत्रांनी व्हावेत असा आग्रह शाहूंनी धरला.
- ❖छत्रपती घराण्याचे धार्मिक विधी करण्यासाठी अप्पासाहेब राजोपाध्ये यांना वार्षिक ३०,०००/- रु. इनाम मिळाला होता. अप्पासाहेब राजोपाध्ये हे छत्रपतींच्या पंचगंगेवरील कार्तिक स्नानाच्या वेळेस हजर होते. नोव्हेंबर १९०१ मध्ये राजघराण्यातील धार्मिक विधी वेदोक्त पध्दतीने करण्याबद्दल महाराजांनी फर्मान सोडले. पण राजोपाध्ये यांनी त्यास नकार दिला. त्यांचा नारायण भटजीच्या मतास पाठिंबा होता. त्यामुळे शाहुनी १ मे १९०२ रोजी त्यांना इनाम जप्त का करू नये?. अशी विचारणा केली. शाहु छत्रपती असले तरी त्यांच्या घरातील विधी पुराणोक्त पध्दतीनेच केली जात होते. राजोपाध्यांना चूक सुधारण्याची संधी महाराजांनी दिली. पण राजोपाध्ये यांना लोकमान्य टिळक व कोल्हापूरातील सनातनी ब्राम्हणांचा पाठिंबा होता.

❖ शाहु महाराजांनी ६ मे १९०२ रोजी त्यांना नोकरीवरुन काढून टाकले व वतनही रद्द केले. राजोपाध्ये यांनी आपली नेमणुक रद्द करण्याच्या व इनाम जप्त करण्याच्या निर्णयाचा शाहुंनी फेरविचार करावा अशी मागणी केली. पण शाहुंनी ती फेटाळली.

❖ राजोपाध्ये यांची इंग्रज प्रतिनिधी कर्नल फेरीसकडे दाद मागितली. त्यांनीही त्यांचा अर्ज फेटाळला. त्यानंतर मुंबई सरकार व व्हाईसरॉय लॉर्ड कर्झनकडे तक्रार केली पण त्यांनीही अर्ज फेटाळला. शाहुंची ब्रिटीश राजवटीवर निष्ठा होती. राजोपाध्ये यांचे टिळक व त्यांच्या अनुयायांशी मैत्रीचे संबंध होते.

❖ वेदोक्ताचा तंटा विकोपाला जात आहे हे पाहुन दोन्हीही पक्ष आपल्या बाजुने ऐतिहासिक पुरावे, दस्तऐवज, प्रतिष्ठीत व्यक्तींचा पाठिंबा मिळवून पक्ष बळकट करण्याचा प्रयत्न करु लागले. टिळक, चिपळुणकर, न. चिं. केळकर, महादेव बोडस, बाळासाहेब नातु, दादासाहेब करंदीकर महाराष्ट्रातील सनातनी ब्राम्हण समाजाचा पाठिंबा राजोपाध्ये यांना होता. वेदोक्त प्रकरणी टिळकांनी २२ व २९ ऑक्टोबर १९०१ ला केसरीतून लेख लिहून खालील युक्तीवाद केले होते.

- ❖वेदोक्त प्रकरणी शेवटी शाहुंचा विजय झाला. त्यांचे क्षत्रियत्व महाराष्ट्रातील ब्रम्हवृदांनी मान्य केले. वेदोक्त प्रकरणामुळे प्रामुख्याने मराठा समाज जागा झाला.
- ❖ वेदोक्त प्रकरण हा ब्राम्हण व क्षत्रिय यांच्यातील श्रेष्ठत्वासाठीचा चाललेला लढा होता.
- ❖ग. त्र्यं. माडखोलकर लिहितात, ***'टिळकांची वेदोक्ताच्या वादातील भुमिका नुसती साहजिक दृष्टीने प्रतिगामीच नव्हे तर शास्त्रशुध्द आणि तर्कशुध्दही नव्हती हे प्रत्ययास येते'.*** वेदोक्त प्रकरणातील शाहुंची भूमिका त्यांच्या व्यापक समाज कारणांशी विसंगत होती.
- ❖ वेदोक्त प्रकरणी फक्त क्षत्रियांसाठी वेदोक्ताचा अधिकार प्रस्थापित व्हावा म्हणुन ते झगडत होते. तो अधिकार फक्त क्षत्रियापुरताच मर्यादित राहणार असल्याने मराठेतर शुद्र व वैश्य वर्गाच्या या मागणीशी काहीच संबंध नव्हता. हा अधिकार वैश्य व अस्पृश्यांसाठी आहे असे शाहुंनी कधीच म्हटले नव्हते. या वादात पुरोहितशाहीची पकड ढिली होणार होती. हिंदु समाजातील उन्मत सनातनी धर्म मार्तंडांच्या विरोधात त्यांनी यशस्वी बंड केले.

# महाराष्ट्र दलित परिषद - माणगाव

- कोल्हापूर संस्थानातील कागल मधील माणगाव या गावी २१ व २२ मार्च १९२० रोजी दलितांची परिषद झाली. या गावामध्ये जैन लोकसंख्या बहुसंख्य असणा-या गावात राजर्षी शाहु महाराजांच्या प्रेरणेने दक्षिण महाराष्ट्रातील बहिष्कृत वर्गाची पहिली परिषद भरवण्यात आली.
- या परिषदेचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या रुपाने अस्पृश्य समाजास एक उमेद नेतृत्व मिळत आहे हा आनंद ही महाराजांनी या वेळी बोलुन दाखविली. माणगावच्या परिषदेला समाजातील प्रस्थापितांचा विरोध असतानाही जवळपास पाच हजार लोकांचा समुदाय उपस्थित होता.
- या परिषदेमध्ये बहिष्कृत वर्गाच्या समाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय उन्नतीबाबत काही ठराव पास करण्यात आले. परिषद झाल्यानंतर माणगावातील सनातनी हिंदुनी दलितांवर बहिष्कार टाकला.
- महाराजांना ही बातमी कळताच त्यांनी गावातील लोकाना बहिष्कार उठवायचा आदेश दिला आणि गावातील दलित लोकांसाठी दुकान काढुन दिले. थोडक्यात माणगाव दलित परिषदेने दलितांच्या स्वातंत्र्य चळवळीस चालना मिळाली.

# महाराष्ट्र दलित परिषद - माणगाव




## ➢विविध कलांना आश्रय दिला :

- राजर्षी शाहु महाराजांना विविध कलांचे छंद होते. शिकार, मल्लविद्या, संगीत, नाट्य, चित्रपट व चित्रकला इ. कलांना त्यांनी आश्रय दिला. ते स्वत: कुस्ती खेळत, प्राण्यांशी झुंज देत असत.
- त्यांनी अनेक नामवंत पैलवान तयार केले. विविध कलाकारांना आश्रय दिल्याने विविध क्षेत्रात प्रगती घडून आली.
- महाराजांनी कलेचे पुनरुज्जीवन केले. त्यांनी पत्रकार, लेखक, कवी, शाहीर, जलसाकार आदींना आश्रय दिला. गायक कोकिळा केसरबाई केरकर, संगीत सम्राट मल्लादिया खाँ, बालगंधर्व, नाटककार मा म वरेरकर, गोविंदराव टेंबे, बाबुराव पेंटर, कवी सुमंत, राजकवी श. बं. भोसले वगैरेना त्यांनी आश्रय दिला होता.
- आपल्या २२ वर्षाच्या कारकिर्दीत कोल्हापूर शहराला त्यांनी कलापूर बनविले. १८९४ ते १९२२ ही त्यांची २८ वर्षांची कारकिर्द कोल्हापूर संस्थानाला नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राला कलाटणी देणारी ठरली.



बाबुराव पेंटर





## • छत्रपती शाहु महाराजांचे शैक्षणिक कार्य :

- छत्रपती शाहु महाराजांच्या एकुण कार्यात त्यांचे शैक्षणिक कार्य अतिशय महत्वाचे आहे.
- सामाजिक सुधारणेच्या कार्यात त्यांनी शिक्षणाला प्रमुख स्थान दिले.
- खेडयांमधून प्राथमिक शाळा नव्हत्या. सर्वसामान्य बहुजन समाज अज्ञानाचे व अंधश्रध्देचे जीवन जगत होता. शिक्षण घेणे हे ब्राम्हण किंवा सावकाराचे काम आहे अशी समजुत समाजाची होती.
- ज्ञानाच्या क्षेत्रात ब्राम्हण जातीची मक्तेदारी ब्रिटीशपूर्व काळापासून निर्माण झाली होती. इं
- ग्रजांनी विद्येची प्रवेशद्वारे सर्व जातीसाठी खुली केली. छत्रपती शाहु महाराजांनी या अज्ञानी बहुजन समाजात ज्ञानाची ज्योत प्रज्वलित करण्याचा निश्चय केला.

## • प्राथमिक शिक्षणाला प्राधान्य :

- समाजात शैक्षणिक विकास घडवून आणण्यासाठी महाराजांनी योजनाबध्द आखणी केली.
- प्राथमिक शिक्षणाचा पाया दृढ केल्यानंतर उच्च शिक्षणापर्यंत वाटचाल करण्याचा त्यांचा निश्चय होता
- त्यांनी प्राथमिक शिक्षणाला तर प्राधान्य दिले, त्याचबरोबर माध्यमिक वउच्च शिक्षणाकडे लक्ष दिले.
- प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराद्वारे भरभक्कम पायावर उच्च शिक्षणाची इमारत उभी करण्याचा त्यांचा प्रयत्न होता.इ
- .स. १९१३ मध्ये शाहु महाराजांनी प्रत्येक गावात निदान एक तरी शाळा असावी व ती शाळा गावात बहुसंख्येने राहणा-या जातीच्या व्यक्तीने चालवावी असे त्यांचे मत होते. शिक्षणा विषयी शिक्षकांच्या मनात आस्था निर्माण व्हावी व त्याने शिक्षण विषयक चळवळीला गती यावी असे महाराजांना वाटत होते.
- बहुजन समाजाच्या सर्वांगिण हितासाठी प्राथमिक शिक्षणाद्वारे छत्रपती शाहु महाराज व्यापक बैठक तयार करीत होते. त्या दृष्टीकोनातुनच त्यांनी निरनिराळया शिक्षण संस्था व व्यक्तींना आर्थिक सहकार्य केले.
- त्यामुळेच कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षणाचा मोठया प्रमाणावर विकास झाला.


THE END
THANK YOU FOR WATCHING OUR PRESENTATION